college permission


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४४१६/9628 दि. 98 जुलै,२०१७

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी),
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
अकोला.

**विषयः-** **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत पी. आर. पोटे (पाटील) एज्युकेशन अॅण्ड वेलफेअर ट्रस्ट, अमरावती या संस्थेच्या कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील कृषी महाविद्यालयास प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत.**

संदर्भः-
१. कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे पत्र जा. क्र. कुलसचिव / कृ.म. / ११४८ / २०१६ दि. १८/७/२०१६
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/ / शिक्षण-१/ ४४१६ / ३११७, दि. ५/१२/२०१६
३. कुलसचिव, डॉ. पंदेकृिव, अकोला यांचे पत्र जा.क्र. अधि (कृषी) / मान्यता १७३/ २०१७ दि. १४/६/२०१७
४. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषी), डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे पत्र जा.क्र. अधि (कृषी) तां. अ. / १७४ / २०१७ दि. १४/६/२०१७

पी. आर. पोटे (पाटील) एज्युकेशन अॅण्ड वेलफेअर ट्रस्ट, अमरावती या संस्थेस कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर मौजे कठोरा रोड, अमरावती जि.अमरावती येथे कृषी महाविद्यालय सुरु करण्यास कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांच्या संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये मान्यता दिलेली असून संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषी), डॉ. पंदेकृवि, अकोला यांच्या संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये या महाविद्यालयाचे नाव सन २०१७-१८ च्या प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याविषयी कळविले आहे.

उमेदवारांकडून महाविद्यालयांचे विकल्प मागविण्यात येऊन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. पदवी अभ्यासक्रमाची सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया दि.१५/६/२०१७ पासून सुरु झालेली असून नियोजित वेळापत्रकानुसार प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि. १०/७/२०१७ होता.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांच्याकडून राबविण्यात येत असल्याने "कृषी महाविद्यालय, मौजे कठोरा रोड, अमरावती" या महाविद्यालयाचा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्याबाबत मे. केटीपीएल, पुणे यांना कळविण्यात येत आहे.

**संचालक (शिक्षण)**
**तथा महासंचालक**

प्रत कार्यवाहीसाठी:-

१. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

यांना सूचित करण्यात येते की, ज्या उमेदवारांनी प्रवेश अर्ज दाखल केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांना "कृषी महाविद्यालय, मौजे कठोरा रोड, अमरावती" या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयाचा विकल्प उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे व दि. १९/७/२०१७ पर्यंत विकल्प समाविष्ट करण्यासाठी संकेतस्थळावर योग्य ती व्यवस्था करण्यात यावी.

प्रत- माहितीसाठी

१. मा. मंत्री (कृषी) यांचे विशेष कार्य अधिकारी, मा. मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-४११०३२.

२. अध्यक्ष, पी. आर. पोटे (पाटील) एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर ट्रस्ट, अमरावती

यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि. ११/२/२०१६ नुसार पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्यापूर्वी डिपॉझिट रक्कम रू.२०.०० लाख कृषी परिषदेकडे धनाकर्षाद्वारे जमा करावी. धनाकर्ष "Financial Advisor, MCAER, Pune" या नावे असावा.